# सोलापूरातील भटक्या-विमुक्त जमातीच्या सामाजिक चळवळीचा अभ्यास

**प्रियांका मधुकर गायकवाड,** इतिहास संशोधन विद्यार्थी,
दें. सं. गरड महाविद्यालय, मोहोळ जिल्हा सोलापूर, piyagaikwad786@gmail.com

---

**प्रस्तावना -**

इतिहास साहित्यामध्ये १९६०-७० च्या कालखंडात अमुलाग्र बदल घडून आलेला दिसतो हा बदल घडून येण्यामागे भारतीय संविधान कारणीभूत झालेले दिसते. भारतीय संविधानामध्ये सर्व जातीजमातींना शिक्षणाची समान संधी प्राप्त झाली शिक्षणामुळे जातीला आत्मभान आले. या विचारातुनच जाती जमातींना आपल्या वाट्याला आलेले दुख: दारीद्र, आवेहलना, दैन्य इत्यादी ओळख होऊ लागली या उपेक्षित सामाजिक समुहाने आपल्या जाती जमातीच्या वेदनांवर वाड्मय निर्मिती करण्यास प्रारंभ केला, ही साहित्य निर्मिती, दलित साहित्य या नावाने संबोधले जाते. या सामाजिक समुहावर लादलेल्या निर्बंधामूळे अमानवी जीवन अज्ञान आणि अंधश्रद्धा यांच्या आधीन राहणे भाग पडत होते. त्यामूळे या समाजाला सामुहिक जीवनात कोणतेही स्थान मिळत नव्हते. भारतीय संविधान अस्तित्वात आल्यानंतर तसेच याच काळात समाजाला आत्मभान येण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या सर्व जाती-जमातींना संदर्भात चळवळी केल्या, त्याच बरोबर जी वैचारीक मांडणी केली त्यातून ते सर्व सामाजिक समूह आपल्या हक्कासाठी संघर्ष करु लागले डॉ. आंबेडकर यांनी सर्व समुहांना समान संधी शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये आरक्षण प्रावदान केले, अनुसुचीत जाती जमातींवर लादलेली अस्पृश्यता अनुसुचीत जमातींना मानवी संस्कृती पासुन दूर, दऱ्याखोऱ्यात, जंगलात जगण्यासाठी करावा लागणारा संघर्ष भटकंती करावी लागणारी सततची भटकंती हे परंपरेने चालत आलेले होते. तसेच विमुक्त जातींवरती गुन्हेगारींचा शिक्का मारुन घातलेले सामाजिक निर्बंध हे पुढे परंपरेने चालत राहिले. मात्र या चार जातीसमुहांपैकी विमुक्त जातींच्या समुहासाठी आधुनिक कालखंडासाठी सामाजिक समानतेचा पुरस्कार करत असताना दुसऱ्या सामाजिक समुहावर निर्बंध घातला जातो. ही घटना अन्यायकारक होती अशा सामाजिक समुहारवरचा एकुणच सामाजिक आणि संस्कृतीक व्यवहार अभ्यासणे आवश्यक झाले.

महाराष्ट्र अस्तित्वात असलेल्या एकुण ४२ जमाती पैकी १४ जमाती विमुक्त जमाती या नावाने ओळखले जातात. ब्रिटीशांनी या देशात १८७१ साली निर्माण केलेल्या गुन्हेगारी कायद्यांन्वये या गुन्हेगारी जमाती म्हणुन त्या काळात जाहिर केले होते. त्या राहण्यासाठी देशात वेगवेगळया ठिकाणी ५२ वसाहती (सेटलमेंट) निर्माण् करण्यात आलेल्या होत्या. त्या वसाहतीमध्ये गुन्हेगार ठरवलेल्या बंदीस्त करण्यात आलेले होते. गुन्हेगारी वसाहतीतील लोक पळूण जावु नयेत म्हणून त्या वसाहतीला चोहो बाजूनी तारांचे कुंपन घालण्यात आले होते. वसाहतीतील लोकांना दररोज ४ वेळा हजेरी द्यावी लागत असे. तसेच त्यांना वसाहती बाहेर सक्तीचे काम करावे लागत असे. त्यांच्या लहान मुलांसाठी ब्रिटीश सरकारने त्या काळात शिक्षणाची वेगळी व्यवस्था केलेली होती. त्यामुळे वसाहतीतील काही मुलांना शिक्षणाचा लाभ होत असे.

१५ ऑगस्ट १९४७, रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. सर्व भारतीय ब्रिटीशांच्या गुलामीतून स्वतंत्र झाले. मात्र ३ तारेच्या कुपनात वसाहतीमध्ये ठेवलेल्या भटक्या जमातीचे लोक स्वतंत्र होऊ शकले नाहीत. ते १९५२ पर्यंत गुन्हेगार म्हणून त्या वसाहतीत बंदिस्त राहीले. १९५२ साली स्वतंत्र भारताचे तत्कालीन ''पंतप्रधान जवाहरलाल नेहरु'' यांच्या हस्ते सोलापुर येथील गुन्हेगार वसाहतीच्या 3 तारांचे कुंपन प्रतिनीधी स्वरुपात तोडण्यात आले आणि वसाहतीत बंदिस्त असणारे लोक मुक्त करण्यात आले त्यांना पुढे विमुक्त या नावाने ओळखले गेले.

त्या महाराष्ट्रातील जमाती उदाहरणार्थ बेरड, बेस्तर, भांमटा, कैकाडी, कंजारभाट, कटाबु, बंजारा, राजपारधी, रजपूत भामटा, रामोशी, वडार, छप्परबंद, वाघारी, फासे पारधी इ. होत. या विमुक्त जमातीशिवाय गावोगावी भटकुन पोट भरणाऱ्या २८ भटक्या जमाती आहेत. या जमाती पिढ्यानपिढ्या जगण्यासाठी भटकत राहिला.

विमुक्त भटक्या जमातीचे वर्गवारी खालील प्रमाणे करता येईल (२८ भटक्या आणि १४ विमुक्त जाती एकूण ४२ जाती)

१) व्यवसायाच्या भटकणाऱ्या जमाती
२) पशुपालन
३) कलावंत जमाती
४) देवदेवतांच्या नावाने भिक मागणाऱ्या जमाती
५) कष्टाचे कामे करणाऱ्या जमाती
६) भविष्य सांगणाऱ्या जमाती
7) शिकार करणाऱ्या जमाती
८) लुटमार, चोरी करणाऱ्या जमाती

**संशोधनाची उद्दीष्टये -**

महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जमातीच्या समस्या प्रश्न यासाठी १९८० पासून सातत्याने चळवळी केल्या. या संघटनेच्या माध्यमातून समाजातील समस्या, संबंधी त्यांच्या संबधी काही मागणी, काही उद्दीष्टये मानन्यात आले आहे. हे उद्दीष्टये पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) जगण्याचे साधन नसलेल्या या जमातीला सरकारी हक्कातील पडीक जमीनी कसण्यासाठी वनीकरण या करीता देण्यात यावे.

२) विमुक्त भटक्या जमातीच्या मुलांच्या उच्च शिक्षणासाठी चे शिक्षण फी नियमित मिळत नाही. ती तत्काळ मिळावी.

3) समाजाच्या कार्यकर्त्यांना पक्षाच्या तालुका शहर जिल्हा पातळीवरील कमी त्यामध्ये नेमणुका देण्याबाबत अनुशंघाने तालुका जिल्हा युवक अध्यक्ष यांना तसे कळविन्यात यावे.

४) समाजातील युवकांना विशेष कार्यकारी दंडाधिकारी पक्षाच्या वतीने नियुक्ती करणे या जमातीच्या समस्या कमी होण्यासाठी किंवा त्यांचे निर्मुलन होण्यासाठी अनेक चळवळी विविध माध्यमातून तसेच शोधकाने सदर शोधनिबंधामध्ये केला अहे.

१) ब्रिटीशाविरद्ध लढणारा रामोशी समाज उपेक्षित गीत.

२) पोलीसांचा महात्रास थांबवावा या करीता निवेदन, ४ जून १९०० ते १९९०

3) दलित महासंघ बेरड रामोशी मेळावा, १९९२, कोल्हापुर.

४) रास्तारोखो १३ जानेवारी २०१३ वाघवाडी फाटा, पुणे

५) हल्लाबोल अंदोलन, दि. २२ जूलै २०१३, मुंबई.

**रामनाथ चव्हाण -**

ब्रिटीश सत्ता भारतात स्थिर स्थावर झाल्यानंतर १८७१ साली ‘‘क्रिमिनल ट्रायबझ ॲक्ट’’ करण्यात आला या कायद्यानुसार भटक्या लोकांच्या समुहाच्या समुह गुन्हेगार टोळ्या ठरविण्यात आले आणि बंदिस्त वस्त्यात त्यांना अडकवुन ठेवण्यात आले. स्वतंत्र भारतात हा कायदा मागे घेण्यात आला. गुन्हेगार टोळ्यात किवा गुन्हेगार जमातींना विमुक्त जाती असे संबोधले जावू लागले."[१]

**बाळकृष्ण रेणके -**

‘‘१९५३ साली मागास्वर्गीय यांच्या अभ्यासासाठी नेमलेल्या काकासाहेब कालेलकर आयोगाचा अहवाल १९५५ साली लोकसभेपुढे ठेवण्यात आला. या आयोगाने आपल्या अहवालात अनुसुचीत जाती - जमाती व्यतिरीक्त इतर मागास्वर्गीय यांची यादी घेऊन त्यांना सवलती त्यांना शिफारस केली होती. शिवाय या यादीतील काही जमाती अत्यंत मागासलेल्या असुन त्यांच्याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे असे प्रतिपादन केले होते. या अत्यंत मागासलेल्या जमाती म्हणजेच “भटक्या विमुक्त जमाती होय.” देशातील १८ कोटीवर लोकसंख्या असलेल्या भटक्या विमुक्त जाती-जमातीच्या लोकांसाठी नेमलेले यापूर्वीचे सहा आयोग सरकारने नेमले होते. यामध्ये

**पुढीलप्रमाणे आयोग-**

१. पहिला आयोग- सायमन अय्यंगार १९४९

२. दुसरा आयोग- काकासाहेब कालेलकर १९५३,

3. तिसरा आयोग- डी.एन. मेहता १९६३,

४. चौथा आयोग- लंकुर आयोग १९६५,

५. पाचवा आयोग- बी.पी. मंडल आयोग १९७८,

६. सहावा आयोग- बाळकृष्ण रेणके २००६

मध्ये आयोग स्थापण्यात आले होते. हा समाज राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, महाराष्ट्र, बिहार, छत्तीसगड, कर्नाटक, आंध्रप्रदेशात सर्वाधिक मोठ्या प्रमाणात आहेत व इतरही राज्यांमध्ये यांची प्रभावी लोकसंख्या आहे.

देशाच्या लोकसंख्याच्या तुलनेत या समाजाला नोकरी व शिक्षण क्षेत्रांत १० टक्के आरक्षण, स्वंतत्र अर्थसंकल्पाची तरतूद केली आहे.

**त्रि. ना. आत्रे -**

“ बहुंश सुगीच्या संधानात व तुरळक इतर दिवसात गावजत्रा ते बिछायती त्यात काही वतनदार व काही उपलानी असतात. येथे वतनदार याचा अर्थ इतकाच की, हे फिरस्ते नियमीत काळी नियमित रहातील गावी येतात व तेथे आपला माल विकून, काम करुन अगर भिक्षा मागुन कमाई करतात. अशा प्रकारे अघाडीच्या दिवसात हे अनेक गावे घेतात आणि पावसाळा ते स्थाईक झाले असतील त्या गावी किवा आपल्या रहाळात कोठे तरी काढतात. जे फिरस्ते नेमलेल्या गावी वहिवाटी प्रमाणे नयेता वाटेल तेथे भटकतात त्यांना आपन उपलानी म्हणू.”[3]

**डॉ ज्योतीप्रसाद जैन -**

"प्राचीनतम काळात जेव्हा मानवी संस्कृतीचा उदय होत होता. तेव्हा कमीत कमी भारतात ही मनुष्यजाती तीन प्रमुख संप्रदायामध्ये विभागलेली होती आणि त्यांचे आचार-विचार आणि संस्कृती परस्परांहून भिन्न होती. तिसरा समुदाय हा मानवंशाच्या लोकांचीच एक शाखा होय. कोणत्या एके फार पूर्वकाळी मध्यप्रदेशीय मुळमानव जाती पासून फुटून निघुन उत्तर पश्चिमेकडील पर्वत्मय प्रदेशाकडे ही शाखा निघुन गेली हा समूदाय ज्ञान आणि विज्ञान या दोहोन मध्ये अविकसित राहिला. पशुपालन हे त्यांचे प्रमुख कारण होते हा समुह घुमक्कड भटक्याच राहिला."[4]

**अनिल अवचट-**

"आदिम किवा मेंढपाळ समूहांनी कालानुरूप बदलायचे नाकारले असावे, म्हणून त वेगळे व मागास राहिले असावेत, त्यांना तशा स्थितीत ठेवून त्यांचे शोषण उत्तम प्रकारे करता येईल. म्हणून मुख्य समाजाने त्यांना पुढे धाकानेच वेगळे ठेवले किंवा काही जमाती इथल्या मूळ-रहीवासी असाव्यात आणि नंतर आलेल्या लोकांनी त्यांना तेथुन हुसकावून लावून भटके बनवले असावे, किंवा या जमाती दुसरीकडुन इथे आल्या व इथल्या समाजाने त्यांना समजावुन न घेतलयाने त्या समाजाच्या परिघावर भटकत राहिल्या असाव्यात." अवचट यांनी भटक्या जमातीच्या भटक्याविषयी विविध भूमीका घेतलेल्या दिसतात. मात्र निश्चित अशा कोणत्यातरी भूमीकेवर ते ठाम नाहीत. एके ठिकाणी ते म्हणतात की, आदिम किवा मेंढपाळ लोकांनी बदलत्या परिस्थितीनुसार बदलायचे नाकारले असावे त्यामुळे मागास राहिले असावे किंवा त्या आदिम लोकांना तशाच मागासलेल्या स्थितीत ठेवून मुख्य समाजाने त्यांच्यावर धाक दाखवला असावा किवा या जमाती इथल्या मुळ रहिवासी असुन मागाहून आलेल्या लोकांनी त्यांना भटके बनवले असावे किंवा या जमाती दुसरीकडुन आल्यामुळे इथल्या मुळसमाजाला त्यांना आपल्यात सामावून घेतल्या नसल्यामुळे या जमाती भटकत राहिल्या असाव्यात. अवचट यांच्या विधानांना कोणाताही आधार किवा पुरावा नसल्याने ग्राह्य मानता येणार नाही.

**लक्ष्मण माने-**

समाजातील खालच्या वर्गात समजल्या जाणाऱ्या एका जमातीतील भीषण स्थितीचे दर्शन होते. ही जमात म्हणजे कैकाडी जमात होय. या लोकांचे जीवनाचा अविभाज्य भाग असलेल्या अनेक जुन्या प्रथा, परंपरा, रुढी, प्रापंचिक समस्या, विवाहपद्धती, बळीपद्धती इ. पुस्तकातून आपल्याला समजून घेता येतात. आजच्या प्रगती सरकार न्यायालयातीन व्यवस्था डावलून जुन्या कालबाह्य असलेल्या पंचनिवाडावर आणि पंचनिर्णयाच्या व्यवस्था आज ही ठाण मांडून बसलेल्या लोकांमध्ये हे चित्रपाहून आज त्यालाच खेद वाटतो. शिक्षणापासून वंचित राहिलेल्या लोकांसाठी व्यथा मांडलेली दिसून येते. शहरात भटकत असताना त्या ज्या ठिकाणी वास्तव्यास असतील त्याच ठिकाणी शालेय शिक्षण घेत असतं. घटना आणि प्रसंगामुळे हा समाज भरकटला गेला आहे.

अखिल भारतीय स्तरावर विचार करता असे दिसते की, भारतात भटक्या विमुक्त जाती-जमाती ची संख्या फार मोठी आहे. स्वातंत्र्य प्राप्तीचा काळानंतर या समाजाच्या विकासासाठी संघटनात्मक प्रयत्न झाले नाहीत. त्यामुळे या समाजाचा म्हणावा तेवढा विकास झालेला नाही. आज देशात ज्या जाती-जमातीसाठी त्यातले ९८ टक्के भूमिहीन व बेघर आहेत. ९५ टक्के लोकसंख्या द्रारिदय रेषेखालचे जीवन जगत आहे. त्यातल्या ७४ टक्के लोकांना पात्र असूनही त्यांना बी.पी.एल. राशनकार्ड मिळालेला नाही, अशा या द्ररिदी, निराधार आणि परिसिथ्ती शरण लोकांना मानवी हक्कांसाठी लढायला प्रवृत्तता करणे ही आजच्या काळातील अवघड गोष्ट आहे.

**दलित मित्र भिमराव जाधव गुरुजी-**

१९३९ मध्ये सेटलमेट येथे सेवा संघटना ची स्थापन केली. गुन्हेगारीच्या चळवळीच्या विरुद्ध काम करण्यास सुरूवात केली. तसेच १९४४ मध्ये गुन्हेगारीच्या कायदा रद्द व्हावा म्हणून अथक प्रयत्न केले गेले. मुंबई, पुणे, बारामती, अंबरनाथ, विजापूर, हुबळी, गदग, बागलकोट या ठिकाणी बैठका घेतल्या. टकारी समाजाचे पहिले अधिवेशन पुणे येथे १९४५ रोजी भरवले गेले होते. ''कर्मवीर भाऊराव पाटील'' यांच्या मदतीने अणि दुसरे अधिवेशन सोलापूर मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर या अधिवेशनकरीता आणले गेले होते. १३ ऑगस्ट १९४९ रोजी तारेच्या कुंपनातून मुक्त केले ''पंतप्रधान जवाहरलाल नेहरु'' यांनी गुन्हेगार जमात यातून सुटका करुन दिले गेले. १९५१ मध्ये शिक्षकीपेशा त्याग करुन समाजाला उपयुक्त ठरवण्यास म्हणून कामास हातभार लावला गेला. महाराष्ट्र हरिजन सेवक संघे प्रचारकाचे नोकरी स्वीकारले. १९५१ मध्ये शाहू फार्मिंग सोसायटी स्थापन करून बेळगाव या ठिकाणी केले. टकारी समाजातील बांधवाना शेती कसण्यासाठी मिळावी यासाठी अथक प्रयत्न केले. जेऊर अक्कलकोटच्या महाराजाची शिकार करण्याची जी जागा होती ३८२ एकर जागा ही शासनाकडून पाठपुरावा करुन ती जागा आपल्या समाजातील लोकांना मिळवुन दिले. शेती, कृषी

उत्पादन, पशुपालन इ. आष्टी येथे कैकाडी, पामलोर जमातीसाठी १४५ एकर गाळचेपी जमिन मिळवून दिले. १९५४ मध्ये सर्वोदय छात्रालय, विमोचित बालिक, वस्तीगृह, समर्थ विदयार्थी वस्तीगृह, समाजकल्याण केंद्र स्थापन केले. १९५५ मध्ये लांबोटी येथे आश्रमशाळा सुरूवात पहिले गुन्हेगार जाती-जमाती करीता आश्रमशाळा काढते गेले. अशाप्रकारे आपल्या समाजासाठी भिमराव गुरूजी ने मोठ्या प्रमाणात आपले योगदान दिले.

**संशोधनाचे गृहीतके-**

स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील भटक्या विमुक्तांच्या चळवळींचा ऐतिहासीक अभ्यास'' या संशोधन विषयाचा अनुशंघाने पुढील गृहीतके निश्चित करण्यात आली आहे.

१) भटक्या विमुक्तांच्या चळवळीने महाराष्ट्रातील विविध परिवर्तन वादी चळवळीत आपले स्थान निर्माण केले आहे.

2) भटक्या विमुक्तांच्या चळवळीत सुधरणावादी मानमुक्तीच्या विचारावर आधारीत आहेत.

3) भटक्या-विमुक्तांच्या चळवळीने शासनास भटक्या विमुक्तांना विकासासाठी विविध निर्णय घेण्यास भाग पाडले आहे.

४) स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रात भटक्या विमुक्तांच्या परिवर्तनवादी व सुधारणावादी चळवळीने महत्वाचे ऐतिहासीक योगदान दिले आहे.

५) जागतिकिकरणानंतर महाराष्ट्रातील भटक्या-विमुक्तांच्या चळवळीचे स्वरुप आमूलाग्र बदलेले आहे.

**संशोधन पद्धती -**

" स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील भटक्या-विमुक्तांच्या ऐतिहासीक अभ्यास" या संशोधन विषयाच्या संशोधन करण्यासाठी संशोधन साधने व सर्वेक्षणात्मक पद्धतीचा वापर करणार आहे. उपरोक्त संशोधन विषयाच्या अनुशंघाने उपयोजित ऐतिहासिक पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. या शिवाय १९६० नंतर भटक्या- विमुक्तांच्या चळवळीचे विश्लेषण आणि विवेचन करणारे संदर्भग्रंथ, नियतकालिकातील लेख, संशोधन लेख यासह प्रत्यक्ष चळवळीत योगदान दिलेल्या नेतृत्वाचा आणि कार्यकर्त्यांच्या मुलाखती घेऊन संशोधन विषयाची माहीती संकलीत करण्यात येणार आहे.

आर्य-अनार्य यांच्या संघर्ष होऊन पराभूत झालेल्या जातीमधील उदयास आले असावेत. हा केलेला अंदाज वस्तूस्थीतीला धरुन नाही. उपजीवीकेसाठी गावोगाव भटकंती करणारे जमातीला घुमक्कड किवा भटके विमुक्त संबोधले जाते. १८७१ सालच्या ब्रिटीश कायद्यानुसार ज्यांना गुन्हेगार ठरवले गेले त्या जमातीलाच विमुक्त संबोधन्यात येऊ लागले. वतनदार, फिरस्ते, भटकंती करणारे यांचा विमुक्तांचा अंतर्भाव केलेला आहे. १९५३ च्या काकासाहेब कालेलकर अहवालात विशेष सवलती देण्याची शिफारस कलेले जाती-जमातीचे समूह म्हणजे भटके विमुक्त होय.

आदिम, मुळ रहिवासी यांना भटकत ठेवणाऱ्या अवस्थेतुन बंदीस्त क्रिया म्हणजे विमुक्त ज्या समाजाला स्वत:चे गाव नाही, शिवार नाही, घर नाही, अशा पोटासाठी वणवण फिरणाऱ्या जमाती म्हणजे भटके विमुक्त होय.

**संदर्भ साहित्य**

१) प्रा. रामनाथ चव्हाण (भटक्या विमुक्तांचे अंतरंग- पृ. क्रमांक २१)

२) प्रा. बाळकृष्ण रेणके (भटक्या विमुक्तांचा ऐलगार येत आहे पृ. क्रमांक १६)

3) प्रा. रामनाथ चव्हाण (मासिक साहित्य चपराक दिवाळी अंक, २०१४)

४) त्रि. ना. अत्रे (गाव गाडा पृ. क्रमांक ६)

५) लक्ष्मण माने - उपरा - १९८०